ePaper


## पक्षाकडून शिवतारेंना कारणे दाखवा नोटीस, 24 तासांत लेखी उत्तर देण्याचे आदेश!



| वर्ष - 7 | अंक - 308 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 28 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- 'रन' धुमाळीत हैदराबादची सरशी
- अदिती राव हैदरीने केलं दुसरं लग्न?
- केजरीवाल यांना दिलासा नाहीच!
- बच्चू कडूंसमोर हात जोडून विनंती

## खासदार श्रीरंग बारणे धनुष्यबाणावर लढण्याची शक्यता

# मावळमध्ये दोन्ही शिवसेना आमने-सामने?

## » मंचरच्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवारांचे सुतोवाच







**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी**

**मावळ लोकसभा मतदारसंघातुन धनुष्यबाणाच्या चिन्हावर खासदार श्रीरंग बारणे लढतील हे जवळपास स्पष्ट झाले आहे. मंचरच्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच त्याबाबत सुतोवाच दिले आहे. मावळ मध्ये धनुष्यबाणाचा प्रचार करा, असे आवाहन त्यांनी केले होते. त्यामुळे उद्धव ठाकरें यांच्या शिवसेनेकडून संजोग वाघेरे यांनी मशाल हाती घेतली आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून आता खासदार श्रीरंग बारणे हे मैदानात असणार आहेत. दोन्ही शिवसेना आमने सामने असल्याने या मतदारसंघातील लढत रंगतदार ठरणार आहे. मावळचे शिवसैनिक कोणाच्या बाजूने असणार, हे निवडणूक निकालानंतर स्पष्ट होणार आहे.**

शिवसेनेच्या फुटीनंतर शिरूर लोकसभेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील आणि मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. कालांतराने राज्यातील आणि मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलली. शिरूर लोकसभा उपमुख्यमंत्री अजित पवारांना सोडली. त्यामुळे त्यांच्या पक्षात प्रवेश करत घड्याळावर लढण्याची नामुष्की आढळराव पाटील यांच्यावर आली. मावळ लोकसभेत खासदार बारणे कोणता झेंडा हाती घेणार यावर चर्चा रंगली आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मंगळवारी (दि. २६) झालेल्या मंचर येथील सभेत स्पष्ट केले आहे. पवार यांनी कार्यकर्त्यांना आवाहन करताना म्हणाले की, बारामती आणि शिरूर मध्ये घड्याळाचा प्रचार करा. मावळ मध्ये धनुष्यबाणाचा आणि पुणे शहरात कमळाचा प्रचार करा. त्यांच्या या वाक्यावरून मावळमध्ये खासदार श्रीरंग बारणे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या धनुष्यबाणावर लढतील, हे स्पष्ट झाले आहे.

त्यामुळे मावळ मध्ये वाघेरे विरुद्ध बारणे यांच्यात राजकीय आखाडा पाहायला मिळणार आहे. गेल्या दोन वेळेला मावळच्या जनतेने बारणे यांना खासदार केले. गेल्या निवडणुकीत पार्थ पवार असताना देखील त्यांना एक लाखापेक्षा अधिक मताधिक्य मिळाले होते. मात्र आता ठाकरे यांच्या शिवसेनेची साथ सोडल्याने त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवसैनिक आणि मावळची जनता स्वीकारणार का, हे पाहावे लागणार आहे.

### तर खासदार बारणे यांच्यासाठी निवडणूक सोपी ठरणार ?

» खासदार श्रीरंग बारणे हे भाजपाच्या कमळावर लढण्यासाठी आग्रही असल्याची चर्चा होती. मात्र त्यांना भाजपा मधून मोठा विरोध झाल्याचे पाहायला मिळाले. महायुतीमधील वाद टाळण्यासाठी त्यांना कदाचित शिवसेना म्हणूनच लढावे लागेल अशी स्थिती आहे. या मतदारसंघात दोन शिवसेनेत लढत झाल्यास त्याचा फायदा उद्धव ठाकरे यांना होईल असे राजकीय जाणकार सांगत आहेत. भाजपासह उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समर्थक महायुतीचा धर्म किती पाळतील या बाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. या उलट भाजपाच्या कमळावर बारणे लढले तर त्यांना निवडणूक सोपी होईल, असेही राजकीय गणित राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

## पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय मार्चअखेर सुट्टीच्या दिवशी सुरू

### » 2023-2024 या आर्थिक वर्षातील महसूली उद्दीष्ट साध्य करण्याची शक्यता

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

नवीन वाहन नोंदणी आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या करवसुलीची रक्कम शासकीय तिजोरीत जमा होण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय येत्या शुक्रवार २९ मार्च ते रविवार ३१ मार्चपर्यंत सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार आहे.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील महसूली उद्दीष्ट साध्य करण्यासाठी तसेच मार्चअखेर असल्यामुळे नवीन वाहनांची मोठ्या प्रमाणात खरेदी होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने गुड फ्रायडे २९ मार्च, शनिवार ३० मार्च व रविवार ३१ मार्च या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नवीन वाहन नोंदणी व त्याअनुषंगीक करवसुलीचे कामकाज तसेच इतर परिवहन विषयक कामकाज जसे थकीत कर वसुली व खटला विभागाचे (महसूल जमा होणारे कामकाज) कामकाज कार्यालयीन वेळेत सुरु राहणार आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी कळविले आहे.



# देहूमध्ये तुकाराम बीज सोहळ्यानिमित्त भाविकांची अलोट गर्दी!

## भजनी दिंड्या, काकडआरती, महापूजा, हरिपाठ अन् वीणा, टाळ, मृदंग, चिपळ्यांची साथ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाविकांच्या अभंगगजरात बुधवारी देहूनगरी दुमदुमली. भजनी दिंड्यांनी रात्रभर केलेला जागर, काकडआरती, महापूजा, हरिपाठ अन् वीणा, टाळ, मृदंग, चिपळ्यांची साथ अशा भक्तिमय वातावरणात बीज सोहळ्याला अलोट गर्दी झाली आहे. संत तुकाराम महाराजांच्या ३७६ व्या बीज सोहळ्यासाठी लाखो भाविक देहूमध्ये दाखल झाले आहेत.**



जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे आजच्या दिवशी सदेह वैकुंठ गमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचे बीज सोहळ्याचे ३७६ वर्षे आहे. देहूनगरीत या दिव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले. पहाटे तीन वाजता मुख्य देऊळवाड्यात काकड आरती झाली. पहाटे चार वाजता संस्थानचे विश्वस्त, अध्यक्ष मंडळ, वंशज, वारकरी यांच्या हस्ते श्री पूजा, संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात महापूजा झाली. पहाटे साडेचार वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पूजा झाली. पहाटे सहा वाजता वैकुंठगमन स्थान येथील संत तुकाराम महाराज मंदिरात महापूजा झाली.

सकाळी साडेदहा वाजता पालखीचे वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान झाले. त्यानंतर वैकुंठगमन सोहळ्यात देहूकर महाराजांचे कीर्तन झाले. दुपारी बारापर्यंत तुकोबारायांच्या नामाचा, विठ्ठलाच्या नामाचा गजर झाला. नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून आणि मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले. दुपारी साडेबारा वाजता वैकुंठस्थान येथून पालखीचे मुख्य देऊळवाड्यातील मंदिराकडे आगमन झाले.

---

# माढा मतदारसंघांबाबत अजित पवार यांची सावध भूमिका

## पवार यांनी बुधवारी पुण्यात पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीचे जागा वाटप अद्यापही निश्चित झालेले नसताना सातारा, नाशिक आणि माढा लोकसभा मतदारसंघासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी पुण्यात पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.**



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनीही पवार यांची भेट घेतल्याने सातारा आणि नाशिक लोकसभा मतदारसंघात अदलाबदली होईल, अशी चर्चा सुरू आहे. मात्र, अजित पवार यांनी याबाबत सावध भूमिका घेतली असून आज गुरुवारी (२८ मार्च) सर्व चित्र स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले. नाशिकची जागा शिवसेनेकडे असून हेमंत गोडसे यांना उमेदवारी द्यावी, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे आग्रही आहेत. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना नाशिक मतदारसंघ हवा आहे. महायुतीच्या जागा वाटपात सातारा लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला मिळणार असल्याचे बोलले जात होते.

मात्र सातारमधून भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे.

त्यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सातारा आणि नाशिक लोकसभा मतदारसंघाची अदलाबदल करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे शिवसेनेचीही कोंडी होण्याची शक्यता आहे.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार, खासदारांची अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात मंगळवारी (२६ मार्च) बैठक झाली होती. त्यामध्ये बारामती, शिरूर, सातारा, धाराशिव, नाशिक, रायगड, परभणी या लोकसभेच्या सात जागांसंदर्भात चर्चा झाली होती.

### सातारा लोकसभेची जागा राष्ट्रवादीकडे

» त्यानंतर अजित पवार यांनी बुधवारी पैलवानांचा मेळावा घेतला. या मेळाव्यानंतर पुन्हा सातारा, नाशिक आणि माढा लोकसभा मतदारसंघासंदर्भात चर्चा करण्यात आली.महायुतीच्या जागा वाटपामध्ये सातारा लोकसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. मात्र, या मतदारसंघातून राज्यसभेचे खासदार उदयनराजे भोसले भाजपकडून लढण्यास इच्छुक आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी आग्रही आहेत.

# भोसरीतील विलासरावांची नाराजी; शिरुरसाठी आढळरावांची डोकेदुखी!

## भोसरीतून 'लीड'साठी मनोमिलनाची अपरिहार्यता : लांडे-लांडगे जोडीची ताकद निर्णायक ठरणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरुर लोकसभा मतदार संघातून उमेदवारी मिळवण्यासाठी शिवाजीराज आढळराव पाटील यांनी 'शिवबंधन' सोडून हातावर 'घड्याळ' बांधले. त्यासाठी मंचरला पक्षप्रवेश कार्यक्रम झाला. शक्तीप्रदर्शन करण्यात आले. मात्र, या व्यासपीठावर भोसरीचे माजी आमदार विलास लांडे आणि हडपसरमधील राष्ट्रवादीचे आमदार चेतन तुपे दिसले नाहीत.**







आढळराव पाटील यांनी निवडणुकीसाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाशी 'कॉम्प्रमाईझ' केले. राजकीय विरोधक कॅबिनेटमंत्री दिलीप वळसे-पाटील आणि आमदार दिलीप मोहिते-पाटील यांच्याशी जुळवून घेतले. त्यामुळे खेड आणि आंबेगावमध्ये आढळराव यांना फायदा होईल, असा दावा केला जातो.

२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत डॉ. अमोल कोल्हे यांच्या विरोधात भोसरी विधानसभा मतदार संघातून आढळरावांना तब्बल ३७ हजार मतांचे लीड मिळाले होते. त्यामुळे या निवडणुकीत आढळरावांच्या विजयाचा मार्ग भोसरीतून सोपा होणार आहे. त्यासाठी भोसरीसह ग्रामीण भागात मोठा प्रभाव असलेले माजी आमदार विलास लांडे यांची साथही तितकीच महत्त्वाची ठरणार आहे. याचा पूर्ण अंदाज असल्यामुळेच आढळराव पाटील यांनी पक्षप्रवेश कार्यक्रमाच्या व्यासपीठावर माजी आमदार विलास लांडे, आमदार महेश लांडगे यांचे फोटो न चुकता समाविष्ट केल्याचे पहायला मिळाले. पण, या कार्यक्रमाकडे विलास लांडे यांनी पाठ फिरवली. त्यात लांडे यांनी अजित पवार गटाकडून महायुतीसाठी लोकसभेची उमेदवारी मागीतली होती. विशेष म्हणजे, महायुतीमध्ये प्रसंगी महेश लांडगे यांना उमेदवारी द्या... अशी जाहीर भूमिकाही त्यांनी मांडली होती. मात्र, राष्ट्रवादीने त्यांच्या उमेदवारीला बगल दिली. लांडे आणि लांडगे हे मामा-भांजे आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीची चर्चा जास्त झाली.

### ... तर डॉ. कोल्हे यांच्यासमोर तगडे आव्हान!

२०१९ मध्ये महेश लांडगे यांच्यासोबत जुळवून घेण्यासाठी आढळराव पाटील यांनी जाहीरपणे पत्रकार परिषद घेतली होती. त्यामध्ये भाजपा आणि लांडगे यांच्यावर केलेले आरोप राजकीय भूमिकेतून होते. आमच्यामध्ये आता राजकीय संघर्ष नाही, असे जाहीर केले होते. त्यामुळे आता राष्ट्रवादीचे नेते आणि माजी आमदार विलास लांडे यांच्याबाबतही आढळराव तीच भूमिका घेणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. कारण, मतदार संघातील राजकीय विरोधक दिलीप मोहिते, दिलीप वळसे यांच्यासोबत आढळराव यांनी समझोता केला आहे. आता भोसरीत विलास लांडे यांच्याशी जुळवून घेतल्यास डॉ. अमोल कोल्हे यांच्यासोबत तगडे आव्हान निर्माण करण्यात यश मिळेल, असा दावा राजकीय जाणकारांनी केला आहे.

### शिरुरचा खासदार विलास लांडे-महेश लांडगे ठरवणार!

**» आमदार महेश लांडगे गतवेळीप्रमाणे महायुती धर्माचे पालन करीत आढळराव पाटील यांच्यासोबत ताकदीने प्रचार करतील. मात्र, माजी आमदार विलास लांडे यांच्या नाराजीचा फटका आढळराव यांना बसण्याची शक्यता आहे. कारण, राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये भोसरी मतदार संघात लांडे यांचा प्रभाव मोठा आहे. भोसरी मतदार संघात ५ लाख ३५ हजार ६६६ इतके मतदान आहे. यामध्ये लांडे आणि लांडगे यांचे वरचष्मा राहणार असून, आढळराव पाटील यांना या दोन्ही नेत्यांची जुळवून घेण्याशिवाय पर्याय नाही. गतवेळी डॉ. कोल्हे यांचा लांडे यांनी प्रचार केला होता. लांडे आणि राष्ट्रवादीची एकत्रित ताकद सुमारे ७० हजार मतांची आहे. त्यामुळे लांडे आणि लांडगे यांची एकत्रित साथ शिरुरचा खासदार ठरवणार आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.**

---

# मुरलीधर मोहोळांच्या पाठिशी आता संजय काकडेंचे बळ

## मोहोळांची ताकद वाढली ! शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीचे चित्र आता हळूहळू स्पष्ट होऊ लागले असून युती आणि आघाडीचे उमेदवार जवळपास निश्चित झाल्याच दिसत आहे. पुणे लोकसभा मतदारसंघात भाजपने मुरलीधर मोहोळ यांच्या रूपाने युवा नेतृत्वाला संधी दिली असून कॉंग्रेसकडून आमदार रवींद्र धंगेकर हे उमेदवार आहेत.**



धंगेकर यांना उमेदवारी मिळाल्यानंतर कॉंग्रेसमध्ये नाराजीनाट्य सुरु असल्याने राज्यस्तरावरील नेत्यांच्या बैठकीकडेही पदाधिकारी पाठ फिरवत आहेत.

याच्या उलट चित्र भाजपमध्ये पाहायला मिळत असून पक्ष नेतृत्वाने नाराजी दूर केल्यानंतर इच्छुक राहिलेले नेते अंगझटकून कामाला लागले आहेत.

भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी पक्षीय नेत्यांसह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना भेटण्याचा सपाटा लावला आहे. भाजपचे माजी राज्यसभा खासदार आणि शहरामध्ये तगडे 'नेटवर्क' असणारे संजय काकडे यांची मोहोळ यांनी भेट घेतली. यामुळे काकडेंचे बळ देखील आता पाठीशी राहणार असल्याने मोहोळांची ताकद वाढणार आहे. संजय काकडे हे स्वतः लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक होते, परंतु पक्ष घेईल तो निर्णय मान्य असून ज्याला उमेदवारी मिळेल त्यांचे काम पूर्ण ताकदीने करणार असल्याचं त्यांनी आधीच स्पष्ट केलं होत.

### वडगाव शेरीत जगदीश मुळीकांच्या मॅरेथॉन बैठका

**»पुणे लोकसभेसाठी आणखीन एक इच्छुक राहिलेले माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी दूर केली. यानंतर आता मुळीक हे देखील मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचार यंत्रणेत सक्रीय झाले आहेत. महिला आघाडीच्या बैठकीनंतर मतदारसंघातील सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेत जास्तीत जास्त मताधिक्य मिळवण्यासाठी कामाला लागण्याच्या सूचना त्यांनी केल्या आहेत.**

# ‘भारत जोडो न्याय यात्रे’ने काय केले?



**भूमिका**

**वर्षभरापूर्वीच्या बहुचर्चित ‘भारत जोडो यात्रे’पेक्षा आताची ‘भारत जोडो न्याय यात्रा’ अधिक यशस्वी ठरली आहे का हा प्रश्न १७ मार्च रोजी या दुसऱ्या यात्रेची सांगता झाल्यावर मुंबईहून परत येताना मी मलाच विचारला. ‘रोड वॉकर: अ फ्यू माइल्स ऑन द भारत जोडो यात्रा’ हे ‘भारत जोडो यात्रे’संदर्भातले अत्यंत आकर्षक आणि चिंतनशील प्रवासवर्णन (ट्रॅव्हलॉग) सातत्याने लोकांपुढे मांडणारे दिलीप डिसुझा या प्रवासात माझ्यासोबत होते.**

मला पडलेला प्रश्न साहजिक आहे. पहिली ‘भारत जोडो यात्रा’ ज्या घटकांमुळे लोकप्रिय झाली, तसेच सगळे घटक ‘भारत जोडो न्याय यात्रे’मध्येही होते. या दुसऱ्या यात्रेचेही उत्साहवर्धक स्वागत झाले. राहुल गांधींनी काँग्रेसच्या स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय नेतृत्वासह ६,७०० किमीचा प्रवास केला. या यात्रेचा समारोप मुंबईत शिवाजी पार्कवर ‘न्याय मंझिल’ या प्रचंड सभेने झाला. पहिल्या यात्रेप्रमाणेच या यात्रेतही अनेक उत्साहवर्धक गोष्टी होत्या. मणिपूरमधल्या कुकी महिलांचे आशावाद व्यक्त करणारे चेहरे मी विसरू शकत नाही राहिली. मध्य प्रदेशातील बुंदेलखंडमधील दलित महिलांना त्यांच्या गावात आजही चप्पल घालायला परवानगी नाही. राहुल गांधी यांनी त्यांना चप्पल अर्पण केली.या यात्रेचे ठिकठिकाणी अत्यंत नेत्रदीपक स्वागत झाले. काही ठिकाणी स्थानिक लोकांशी तपशीलवार चर्चा झाली. हे सगळे क्षण



कॅमेऱ्यामध्ये टिपले गेले आहेत. पण तरीही, या यात्रेकडे मुख्य प्रवाहातील माध्यमांनी फारसे लक्ष दिले नाही. एवढंच नाही तर पर्यायी माध्यमांमध्येही गेल्या वेळेइतका उत्साह नव्हता. असे दुर्लक्ष का केले गेले हे समजून घेणे फारसे अवघड नाही. एखाद्या गोष्टीची पुनरावृत्ती झाली तर ती मूळच्याइतकी रोमांचक कधीच नसते.‘भारत जोडो यात्रे’च्या यशाने खूप जास्त, जवळजवळ अशक्य कोटीमधल्या अपेक्षा ठेवल्या होत्या. शिवाय वाहन यात्रा ही पदयात्रेइतकी लक्षवेधी कधीच असू शकत नाही. लोकसभा निवडणुका खूप जवळ आल्या होत्या, विधानसभा निवडणुकीतील निर्विवाद निकालांमुळे आणखी परिणाम झाला. आणि काँग्रेस आधीच इंडिया आघाडीचा भाग असल्यामुळे काँग्रेसने स्वबळावर यात्रा काढण्याबाबत प्रश्न उपस्थित केले गेले.

यापैकी काही चिंता खऱ्या ठरल्या, विशेषतः पश्चिम बंगालमध्ये. इंडिया आघाडी आणि काँग्रेसबाबत अनेक उल्लेखनीय गोष्टीही घडल्या. अर्थात सगळ्याच गोष्टीची राजकीय पातळीवर जाहिरात होऊ शकत नाही. ही सर्व आव्हाने असतानाही यात्रेतून काहीतरी भरीव साध्य करण्यात यश आले, हे महत्त्वाचे.मूळ ‘भारत जोडो यात्रे’ने काय साध्य केले याबद्दल सांगताना डिसोझा खालील तीन मुद्दे मांडतात: “एक म्हणजे, जे हा देश तोडू पाहतील त्यांच्या विरोधात उभे रहा. दुसरे, लोकांचे म्हणणे पूर्णपणे आणि प्रामाणिकपणे ऐका. शिक्षण, आरोग्य, महिलांचे प्रश्न, नोकऱ्या, महागाई यातले काहीही असो, पण त्यांच्या चिंतांबद्दल बोला. तिसरे, अशा चिंतांचे निराकरण करण्यासाठी काँग्रेसच्या स्वतःच्या योजना, स्वतःची दृष्टी मांडा.” त्यांच्या मते, काँग्रेसने पहिल्या दोन उद्दिष्टांमध्ये चांगली कामगिरी केली, तर तिसऱ्या मुद्द्याच्या बाबतीत आणखी गोष्टींची गरज होती.त्यांच्या मते, भारतातील लोकशाही वाचवू इच्छिणाऱ्या सगळ्यांमध्ये ‘भारत जोडो यात्रे’ने आशा जागवली आहे. त्यासाठी संघर्ष करता येऊ शकतो हे दाखवले आहे. मी या काळातील माझ्या लिखाणामधून यात्रेचा मागोवा घेतला आणि लोकांच्या मनात आशा निर्माण करणे, प्रेमाची एक नवीन भाषा देणे आणि छुप्या भांडवलदारांचे नाव उच्चारण्याचे धाडस निर्माण करणे या तीन गोष्टींचे श्रेय तिला दिले.या यात्रेमुळे राहुल गांधींची प्रतिमा ‘पप्पू’ न राहता गंभीर नेते अशी बदलली; त्यांना वारसाहक्काने जे मिळाले होते, ते त्यांनी या यात्रेद्वारे कमावले. या यात्रेचे फलित आधीच्या यात्रेच्या यशावर मोजण्याचा मोह होऊ शकतो किंवा तिचा आगामी निवडणुकीवर होणाऱ्या परिणामावरून ठरवता येऊ शकते. दिल्लीत सभा घेण्यापेक्षा अशी यात्रा काढणे केव्हाही चांगले, असेही म्हणता येईल. तुम्ही या यात्रांना जमलेली गर्दी बघितली तर लक्षात येते की थोडाफार फरक वगळता ती सगळीकडे चांगलीच होती. अलिकडे ज्या निवडणुका झाल्या त्यामधल्या काँग्रेसच्या कामगिरीपेक्षाही ही गर्दी जास्त होती. अर्थात म्हणून लगेच मी कोणताही निष्कर्ष काढणार नाही.

## संपादकीय »

# पांगुळगाडा पुरे!


***अमेरिकेने पाठिंबा दिला नाही तरी आम्ही युद्ध सुरूच ठेवू असे नेतान्याहू म्हणतात. पण अमेरिकेची आर्थिक-लष्करी-राजनैतिक मदत हा इस्रायलचा प्राणवायू आहे..***

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत इस्रायल-हमास यांच्यातील युद्धात शस्त्रसंधीची मागणी करणारा ठराव अखेर एकमुखाने मंजूर झाला. यात ‘अखेर’ असे म्हणायचे कारण याआधी किमान तीन वेळा अशा ठरावांवर अमेरिकेने आपला नकाराधिकाराचा खोडा घालून ते पराभूत केले. या वेळी अमेरिकेने या ठरावावर मतदान केले नाही. ती तटस्थ राहिली. त्यामुळे शस्त्रसंधीची मागणी १४ विरुद्ध शून्य अशा मतांनी मंजूर झाली. याचा फार मोठा धक्का इस्रायलला नक्कीच बसला. आपण काहीही करावे आणि अमेरिकेने आंतरराष्ट्रीय मंचावर आपली पाठराखण करत राहावे याची इतकी चटक इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना लागलेली आहे की त्यांना कोणी अडवणारा राहिलेला नाही. याचा परिणाम नेतान्याहू सोकावण्यात झाला. आधीच हा गृहस्थ कमालीचा बेमुर्वतखोर, आढयताखोर आणि त्यात भ्रष्ट.

लोकसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केल्यानंतर निवडणूक आयोगानं समाज माध्यमांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वं आणि सूचनाही केल्या आहेत. रंगवलेल्या भिंतींपासून समाज माध्यमांपर्यंत आलेल्या राजकीय प्रचारात यंदा आणखी एक यंत्रणा या निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावेल.

# राजकारणातल्या अदृश्य शक्ती

ती यंत्रणा म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि या ‘एआय’ तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेली अनेक ॲप्स!हे शक्य आहे, याची चुणूक २०१६ मध्येच दिसली होती. अध्यक्षपदाच्या उमेदवार हिलरी क्लिंटन यांचा पराभव होण्यामागे दूर रशियात बसलेल्या काही तंत्रज्ञांचा आणि त्यांनी तयार केलेल्या नव्या तंत्रज्ञानाचा हात होता, हे उघडकीला आलं आणि राजकीय जग ढवळून निघालं. मग काही वर्षांनी पेगॅसस नावाच्या एका सॉफ्टवेअरने भारतीय राजकारणात वादळ निर्माण केलं होतं. विरोधकांची बित्तंबातमी काढून त्यांना चाप लावण्याचं काम करण्यासाठी हे सॉफ्टवेअर वापरलं जाऊ शकतं. त्याची खरेदी फक्त सरकार करू शकतं. भारतात या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव टाकला जात असल्याचे आरोप सत्ताधाऱ्यांवर झाले आणि यापुढे भारतीय राजकारणातही काही ‘अदृश्य शक्ती’ कार्यरत राहणार, याची नांदी लिहिली गेली.या ‘अदृश्य शक्तीं’चा पुढला अवतार भारतात प्रकटला




तो नोव्हेंबर २०२२ मध्ये ‘चॅटजीपीटी’ अवतरलं तेव्हा! या सॉफ्टवेअरने अगदी सर्वसामान्यांनाही फुकटात कृत्रिम बुद्धिमत्तेचं कवाड खुलं करून दिलं. हे तर फक्त एक सॉफ्टवेअर.. पण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे चालणाऱ्या सॉफ्टवेअरची फौजच सध्या बाजारात उपलब्ध आहे. काही वृत्तवाहिन्यांनी ‘एआय’ वर आधारित रोबो निवेदक-निवेदिका तयार केल्या. कॉल सेंटरची जागाही आता या चॅटबॉट्सनी घेतली.. या सगळयाचा परिणाम राजकारणावर झाला नसता, तरच नवल! २०१४ च्या निवडणुकीत भाजपने समाज माध्यमाचं तंत्र खूप उत्तम प्रकारे अवगत केलं आणि वापरलंही. पण आता २०२४ आणि त्यापुढील सगळयाच निवडणुकांमध्ये या कृत्रिम बुद्धिमत्तेची म्हणजेच ‘एआय’ ची भूमिका खूप निर्णायक ठरणार आहे. बरं, एखादा पक्ष कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ॲप्स वापरत असेल, तर ते शोधणं किंवा ओळखणंही कठीण जाणार आहे. हे तंत्रज्ञान बाजारात खुलं असल्यानं कोणताही पक्ष त्याचा वापर करू शकतो आणि निवडणुकांवर प्रभाव पाडू शकतो. कदाचित या सगळयाची सुरुवात आपल्या नकळत झालीदेखील असेल. पण ‘एआय’ राजकारणावर, तेदेखील भारतीय राजकारणावर कसा प्रभाव टाकू शकतं, ते एकदा बघू या! कोणत्याही राजकीय पक्षासाठी आणि त्या पक्षाच्या नेत्यासाठी लोकांचा कल कसा आहे, जनभावना कोणत्या दिशेने आहे, हे जाणून घेणं अत्यंत महत्त्वाचं असतं. समाजमाध्यमांचा अभ्यास केल्यास, वारं कोणत्या दिशेने वाहतंय, याची पुसटशी कल्पना येते. कृत्रिम बुद्धिमत्ता नेमकी इथपासूनच राजकारण्यांच्या मदतीला येते. लोकांच्या भावनांचं विश्लेषण करणारी काही टूल्स आज बाजारात आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बच्चू कडूंसमोर हात जोडून विनंती!

## आगामी निवडणुकीत नवनीत राणा यांना आशीर्वाद द्यावा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांना यंदा भारतीय जनता पार्टीकडून अमरावती लोकसभेचं तिकीट हवं होतं. परंतु, त्यांच्या उमेदवारीच्या मार्गात अनेक अडथळे येत होते. सर्वोच्च न्यायालयात चालू असलेलं बनावट जातप्रमाणपत्राचं प्रकरण आणि त्यानंतर भाजपाच्या मित्रपक्षांकडून राणा यांच्या उमेदवारीस होत असलेल्या विरोधामुळे नवनीत राणा यांना भाजपाकडून लोकसभेचं तिकीट मिळणार की नाही याबाबत संभ्रमाचं वातावरण होतं.**




परंतु, भारतीय जनता पार्टीने हा संभ्रम दूर केला आहे. पक्षातील पदाधिकारी आणि एनडीएतील घटक पक्षांचा, नेत्यांचा विरोध जुगारून भाजपाने नवनीत राणा यांना अमरावतीतून लोकसभेचं तिकीट दिलं आहे. भाजपाने काही वेळापूर्वी लोकसभा उमेदवारांची सातवी जादी जाहीर केली असून यामध्ये नवनीत राणा यांचं नाव आहे.नवनीत कौर राणा यांना अमरावतीत शिवसेनेकडून विरोध होत होता. येथील माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनीदेखील राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. राणा यांना उमेदवारी मिळाल्यास आम्ही त्यांचा प्रचार करणार नाही, अशी ठाम भूमिका अडसूळ यांनी घेतली होती. तसेच अमरावतीमधील एनडीएतील घटक पक्ष असलेल्या प्रहार जशक्ती पार्टीचे प्रमुख आणि आमदार बच्चू कडू यांचाही राणा यांना विरोध आहे. बच्चू कडू म्हणाले होते की, आमच्या सर्व कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की ज्या नवनीत राणा यांनी आम्हाला अपमानित केलं त्यांचा प्रचार आम्ही करणार नाही. कार्यकर्त्यांची मानसिकताच नाही. राजकारणात झीरो झालो तरीही चालेल पण इतकी शरणागती पत्करणार नाही. काहीही झालं तरी राणांचा प्रचार करायचा नाही ही कार्यकर्त्यांची मानसिकता आहे. त्यामुळे मतदारसंघात बच्चू कडू, आनंदराव अडसूळ, शिवसेना आणि प्रहारची समजूत काढणं भाजपा आणि नवनीत राणा यांच्यासमोर मोठं आव्हान आहे.गेल्या काही दिवसांपासून नवनीत राणा आणि त्यांचे पती तथा बडनेराचे आमदार रवी राणा हे सातत्याने बच्चू कडूंवर आणि बच्चू कडू हे राणा दाम्पत्यावर टीका करत आहेत. परंतु, पत्नीला लोकसभेची उमेदवारी मिळताच रवी राणा यांचे सूर नरमल्याचं पाहायला मिळत आहे. रवी राणा यांनी काही वेळापूर्वी टीव्ही ९ मराठीशी बातचीत केली. यावेळी त्यांनी बच्चू कडू यांना विनंती केली आहे की, त्यांनी आगामी निवडणुकीत नवनीत राणा यांना आशीर्वाद द्यावा. रवी राणा म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नवनीत राणांवर विश्वास टाकला त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. अमरावतीच्या जनतेला न्याय देण्यासाठी त्यांनी नवनीत राणा यांची निवड केली. त्यासाठी मी अमरावतीच्या जनतेकडून त्यांचे आभार व्यक्त करतो. नवनीत राणा यांनी गेल्या पाच वर्षांत भाजपाची बाजू मांडली आहे. त्यामुळेच देशाच्या हितासाठी पंतप्रधान मोदींनी नवनीत राणा यांची निवड केली आहे.आमदार रवी राणा म्हणाले, अमरावती लोकसभेबाबत बोलायचं झाल्यास कोणत्याही स्थानिक भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा नवनीत राणांच्या उमेदवारीला विरोध नाही. प्रसारमाध्यमं कसल्या बातम्या दाखवत आहेत त्याची मला माहिती नाही. सर्वजण आमच्याबरोबरच आहेत.

### मोदींचे हात बळकट करायचे आहेत

मी एनडीएमधील घटक पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना हात जोडून विनंती करतो, मी बच्चू कडू आणि त्यांच्या प्रहार जनशक्ती पार्टीसमोर हात जोडून विनंती करतो की, आपल्या जिल्ह्याच्या विकासासाठी, महाराष्ट्राच्या आणि देशाच्या हितासाठी आपल्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करायचे आहेत. त्यासाठीच तुम्ही नवनीत राणा यांना आशीर्वाद द्या.परंतु, भारतीय जनता पार्टीने हा संभ्रम दूर केला आहे. पक्षातील पदाधिकारी आणि एनडीएतील घटक पक्षांचा, नेत्यांचा विरोध जुगारून भाजपाने नवनीत राणा यांना अमरावतीतून लोकसभेचं तिकीट दिलं आहे. भाजपाने काही वेळापूर्वी लोकसभा उमेदवारांची सातवी जादी जाहीर केली असून यामध्ये नवनीत राणा यांचं नाव आहे. नवनीत कौर राणा यांना अमरावतीत शिवसेनेकडून विरोध होत होता. येथील माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनीदेखील राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. राणा यांना उमेदवारी मिळाल्यास आम्ही त्यांचा प्रचार करणार नाही, अशी ठाम भूमिका अडसूळ यांनी घेतली होती. तसेच अमरावतीमधील एनडीएतील घटक पक्ष असलेल्या प्रहार जशक्ती पार्टीचे प्रमुख आणि आमदार बच्चू कडू यांचाही राणा यांना विरोध आहे.

# साताऱ्यात उदयनराजे यांचे जोरदार शक्ती प्रदर्शन

## कोणत्याही परिस्थितीत मी निवडणूक लढविणार : उदयनराजे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**साताऱ्यात उदयनराजे यांचे जोरदार शक्ती प्रदर्शन करत जंगी स्वागत करण्यात आले. साताऱ्याची भाजपाची उमेदवारी मला मिळाली आहे. कोणत्याही परिस्थितीत मी निवडणूक लढविणार आहे. वरिष्ठ पातळीवर सर्व निश्चित झाले आहे .मला कोणीही ताटकळत ठेवलं नाही.**



देशाची निवडणूक आहे त्यामुळे प्रक्रियेला वेळ तर लागणारच. आघाडीच्या चर्चेचा विषय असल्याने उमेदवारी जाहीर करणे थोडे लांबणीवर पडत आहे. काहीही झाले तरी मी निवडणूक लढविणार आहे असे खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात शिरवळ येथे सांगितले.दिल्लीतील मुक्काम संपवून साताऱ्यात आलेल्या खासदार उदयनराजे यांचे आज जंगी स्वागत करण्यात आले. साताऱ्याच्या सीमेवर निरा नदी ओलांडून येताच त्यांच्या समर्थकांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले. जेसीबीच्या माध्यमातून त्यांच्यावर जोरदार पुष्पवृष्टी करण्यात आली. क्रेनच्या माध्यमातून काही टन वजनाचे हार त्यांना घालण्यात आले. उदयनराजे साताऱ्यात प्रवेश करतेवेळी महामार्गाला जत्रेचे स्वरूप आले होते. मोठ्या संख्येने त्यांचे समर्थक या ठिकाणी उपस्थित होते. ढोल ताशे छत्र चामरे अशा राजेशाही थाटात त्यांचे स्वागत करण्यात आले. शिरवळ पासून सातारा पर्यंत त्यांची जंगी मिरवणूक काढण्यात आली आहे.साताऱ्याची लोकसभेची जागा महायुतीने अद्यापही जाहीर केलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उदयनराजे यांनी घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवावी असे सांगितलेले आहे. मात्र उदयनराजे हे कमळ या चिन्हावरच निवडणूक लढविण्यावर ठाम आहेत. आजच्या मिरवणुकीत कमळ चिन्ह असलेला रथ सामील करण्यात आला होता.यावेळी पत्रकारांशी बोलताना उदयनराजे म्हणाले,मी निवडणूक लढविणारच आहे. माझी साताऱ्यात लोकसभेची तयारी सुरू होती. परंतु काही कारणास्तव मला दिल्लीला जावे लागले .

### मला दिल्लीला जावे लागले

तिथे गेल्यानंतर मला तिथे कोणीही मला ताटकळत ठेवलेले नाही. ही देशाची निवडणूक आहे. त्यामुळे वरिष्ठांची चर्चेला वेळ तर लागणारच. जिथे पहिल्या टप्प्यात दुसऱ्या टप्प्यात अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. तेथील लोकांशी अगोदर चर्चा करणे गरजेचे असते आणि लोकसभेची निवडणूक ही मोठी प्रक्रिया असते. त्यामुळे मला तिथे कोणी ताटकळ ठेवलेले हे सगळं खोटं आहे.

# केजरीवाल यांना दिलासा नाहीच!

## न्यायालयाने त्यांना 28 मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली सरकारच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केल्यानंतर दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. केजरीवाल यांच्यासह त्यांच्या पक्षातील इतर साथीदारांनी कथित मद्य धोरण प्रकरणात १०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या प्रकरणात अरविंद केजरीवाल यांच्या चौकशीसाठी तब्बल नऊ वेळा समन्स बजावण्यात आलं होतं. परंतु, अरविंद केजरीवाल चौकशीसाठी हजर राहिले नाहीत, अखेर ईडीने त्यांना गेल्या आठवड्यात अटक केली. या अटकेविरोधात आणि रिमांडवर पाठवण्याच्या निर्णयाविरोधात केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.**



परंतु, न्यायालयाकडून केजरीवाल यांना याप्रकरणात दिलासा मिळालेला नाही. उलट या अटकेविरोधात उत्तर दाखल करण्यासाठी न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंत मुदत दिली आहे. न्यायालय येत्या ३ एप्रिल रोजी याप्रकरणी पुढील सुनावणी करेल.२१ मार्च रोजी ईडीने केजरीवाल यांना त्यांच्या शासकीय निवासस्थानातून अटक केली होती. त्यानंतर राऊस एव्हेन्यू न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडीच्या कोठडीत धाडलं. ईडीच्या अटकेला आणि रिमांडला आव्हान देणाऱ्या केजरीवाल यांच्या याचिकेवरून न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी ईडीला नोटीस बजावली असून त्यांच्याकडे या अटकेप्रकरणी उत्तर मागितलं आहे. न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंतची मुदत दिली आहे.केजरीवाल यांच्या वकिलांनी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांची तात्काळ तुरुंगातून सुटका व्हावी यासाठी तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली होती. परंतु, ईडीने तातडीने सुनावणी घेण्यास विरोध केला. तसेच केजरीवाल यांच्या अटकेबाबत उत्तर देण्यास वेळ मागितला. त्यावर न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंत मुदत दिली आहे.अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्यानंतर दिल्ली सरकारचा गाडा कोण हाकणार असा प्रश्न सर्वांना पडला होता. यावर आम आदमी पार्टीने केजरीवाल तुरुंगातून सरकार चालवतील असं उत्तर दिलं होतं. त्यानंतर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीचा कारभार तुरुंगातून चालवण्यास सुरूवात केली आहे. दोन दिवसांपूर्वी दिल्ली सरकारच्या जल मंत्रालयाशी संबंधित पहिला आदेश मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिला. दिल्लीत काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली असून त्या ठिकाणी पाण्याचे टँकर वाढवण्यासंदर्भात केजरीवाल यांनी सूचना दिल्या आहेत.

### सरकारचा गाडा कोण हाकणार

» उलट या अटकेविरोधात उत्तर दाखल करण्यासाठी न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंत मुदत दिली आहे. न्यायालय येत्या ३ एप्रिल रोजी याप्रकरणी पुढील सुनावणी करेल.२१ मार्च रोजी ईडीने केजरीवाल यांना त्यांच्या शासकीय निवासस्थानातून अटक केली होती. त्यानंतर राऊस एव्हेन्यू न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडीच्या कोठडीत धाडलं. ईडीच्या अटकेला आणि रिमांडला आव्हान देणाऱ्या केजरीवाल यांच्या याचिकेवरून न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी ईडीला नोटीस बजावली असून त्यांच्याकडे या अटकेप्रकरणी उत्तर मागितलं आहे. तसेच केजरीवाल यांच्या अटकेबाबत उत्तर देण्यास वेळ मागितला. त्यावर न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंत मुदत दिली आहे.अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्यानंतर दिल्ली सरकारचा गाडा कोण हाकणार असा प्रश्न सर्वांना पडला होता. यावर आम आदमी पार्टीने केजरीवाल तुरुंगातून सरकार चालवतील असं उत्तर दिलं होतं. त्यानंतर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीचा कारभार तुरुंगातून चालवण्यास सुरूवात केली आहे. दोन दिवसांपूर्वी दिल्ली सरकारच्या जल मंत्रालयाशी संबंधित पहिला आदेश मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिला. दिल्लीत काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली

दिल्ली सरकारच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केल्यानंतर दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. केजरीवाल यांच्यासह त्यांच्या पक्षातील इतर साथीदारांनी कथित मद्य धोरण प्रकरणात १०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या प्रकरणात अरविंद केजरीवाल यांच्या चौकशीसाठी तब्बल नऊ वेळा समन्स बजावण्यात आलं होतं. परंतु, अरविंद केजरीवाल चौकशीसाठी हजर राहिले नाहीत, अखेर ईडीने त्यांना गेल्या आठवड्यात अटक केली. या अटकेविरोधात आणि रिमांडवर पाठवण्याच्या निर्णयाविरोधात केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

# काँग्रेस, राजद आणि डावे पक्ष एकत्र निवडणूक लढवणार

## जागावाटपावर सकारात्मक चर्चा झाली असून एकत्र लढण्यावर एकमत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी मंगळवारी (दि. २६ मार्च) इंडिया आघाडीच्या बैठकीला हजेरी लावली. इंडिया आघाडीतील नेत्यांसोबत बिहारमधील लोकसभेच्या जागावाटपावर चर्चा केली. या चर्चेत जागावाटप निश्चित झाले असून जागावाटपाची अधिकृत यादी पटना येथून प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती तेजस्वी यादव यांनी माध्यमांशी बोलताना दिली.**

काँग्रेस नेते मुकूल वासनिक यांच्या दिल्लीतील निवासस्थानी पार पडलेल्या या बैठकीला बिहार काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अखिलेश प्रसाद सिंह आणि प्रदेश प्रभारी मोहन प्रकाश यांचीही उपस्थिती होती.“काँग्रेस, राजद आणि डावे पक्ष एकत्र मिळून लोकसभा निवडणूक लढवणार आहोत. आजच्या चर्चेमध्ये जागावाटपावर सकारात्मक चर्चा झाली असून एकत्र लढण्यावर सर्वांचे एकमत झाले आहे.

सर्व जागांवर सर्व पक्षांमध्ये सन्मानजनक जागावाटप होईल. याचा आम्हाला विश्वास आहे.” दरम्यान बिहारमध्ये काही जागांवर राजदने आपले उमेदवार जाहीर केले. त्यानंतर काँग्रेस




नाराज असल्याचं बोलले जात होते. अशातच आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आज (दि. २७ मार्च) अजून एक बैठक पार पडणार आहे.

त्या बैठकीत जागावाटप निश्चित करून जाहीर केले जाऊ शकते, अशी शक्यता आहे.इंडिया आघाडीच्या पहिल्या बैठकीत लालू प्रसाद यादव यांनी राहुल गांधी यांना सल्ला दिला होता की, दाढी कमी करा आणि लग्न करा. “राहुल गांधीनी भारत जोडो यात्रेतून अतिशय चांगले काम केले आहे, आता राहुलनी दाढी कमी करावी आणि लग्न करावे. सोनिया गांधी लग्नाबद्दल आमच्याकडे तक्रार करत असतात. त्यामुळे राहुलने आता आईचे ऐकले पाहिजे.”

त्यानंतर राहुल गांधीनीही लालूप्रसाद यादवांना सांगितले होते की, “तूम्ही म्हणत असाल तर आता ऐकावे लागेल.” दरम्यान राहुल यांनी लालू प्रसाद यादव यांची मुलगी मीशा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी स्वयंपाकाचे धडे घेतले होते.

### भाजपाची नवी यादी जाहीर

» केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना संबलपूरमधून उमेदवारी जाहीर झाली आहे. भाजपाचे प्रवक्ते संबित पात्रा २०१९ च्या निवडणुकीत ओडिशामधील पूरी या मतदारसंघात पराभूत झाले होते, मात्र यावेळी त्यांना पुन्हा एकदा याच मतदारसंघातून संधी देण्यात आली आहे. संविधान बदलण्यासाठी भाजपला बहुमत हवे आहे, असे विधान करणारे उत्तर कन्नडमधून लोकसभेचे ६ वेळा खासदार राहिलेले माजी केंद्रीय मंत्री अनंतकुमार हेगडे यांची पक्षाने यावेळी हकालपट्टी केली आहे. बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी मंगळवारी (दि. २६ मार्च) इंडिया आघाडीच्या बैठकीला हजेरी लावली.

भाजपाने रविवारी लोकसभा निवडणुकीसाठी १११ उमेदवारांची नावे जाहीर केली, ज्यामध्ये केंद्रीय मंत्री आश्विनी कुमार चौबे, व्हीके सिंग आणि खासदार वरुण गांधी यांना डावलून अभिनेत्री कंगना रणौत आणि अरुण गोविल यांना उमेदवारी दिली आहे.

# आलिशान घरात लवकरच कपूर कुटूंबाची एन्ट्री

बॉलीवूडचं रोमँटीक कपल रणबीर कपूर आणि आलिया भट्ट त्यांच्या अभिनयामुळे तसेच वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमी चर्चेत असतात. अशातच रणबीर आणि आलियाच ड्रीम हाऊस तयार होत आहे आणि या घरात लवकरच कपूर कुटूंबाची एन्ट्री होणार आहे. रणबीर आणि आलियाचं वांद्रे येथे स्वप्नातलं घर तयार होत आहे. अनेकदा या बंगल्याच काम पाहण्यासाठी हे कपल तिथे दिसले आहेत. एका वर्षाच्या आधीपासून या बंगल्याचं बांधकाम सुरू होतं. यापूर्वी हा बंगला दिवंगत ज्येष्ठ अभिनेते राज कपूर आणि त्यांची पत्नी कृष्णा राज कपूर यांच्या नावावर होता आणि कपूर कुटुंबातील एकुलता एक नातू असल्याने ही मालमत्ता रणबीरकडे जाते. आजही रणबीर कपूर बंगल्याबाहेर सुरू असलेल्या बांधकामाची सर्व तपासणी करताना दिसला. यावेळी आलिया भट्ट आणि नीतू कपूरही



उपस्थित होते.बॉलीवूड लाईफच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रणबीर आणि आलिया दोघांनीही त्यांचा आलिशान बंगला उभारण्यासाठी एकत्र पैसे गुंतवले आहेत. शाहरुख खानचा 'मन्नत' आणि अमिताभ बच्चन यांचा 'जलसा' यांच्या तुलनेत रणबीरचा बंगला मुंबई परिसरातील सर्वात महागडा बंगला असेल. असंही म्हटलं जातंय की, रणबीर-आलियाची मुलगी राहा कपूरच्या नावाने या बंगल्याचं नाव ठेवणार आहे. या भव्य बंगल्याबरोबरच आलिया आणि रणबीर या दोघांचे वांद्रे परिसरात ४ फ्लॅट असून त्यांची किंमत ६० कोटींहून अधिक आहे.नीतू कपूर या बंगल्याच्या सह-मालक असतील कारण दिवंगत अभिनेते ऋषी कपूर यांनी त्यांच्या सर्व मालमत्तेची अर्धी जबाबदारी नीतू यांच्याकडे सोपवली होती. नीतूजी स्वत: आर्थिकदृष्ट्या सबळ असल्याचे सांगून अलीकडेच त्यांनी वांद्रे परिसरातच १५ कोटींचे भव्य घर खरेदी केले आहे. बंगला तयार झाल्यानंतर संपूर्ण कपूर खानदान एकाच छताखाली एकत्र राहतील, असा अंदाज आहे.दरम्यान, रणबीर आणि आलियाच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'लव्ह अँड वॉर' या आगामी चित्रपटात रणबीर झळकणार आहे. तर, 'जिगरा' या चित्रपटाद्वारे आलिया लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बॉलीवूडचं रोमँटीक कपल रणबीर कपूर आणि आलिया भट्ट त्यांच्या अभिनयामुळे तसेच वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमी चर्चेत असतात. अशातच रणबीर आणि आलियाच ड्रीम हाऊस तयार होत आहे आणि या घरात लवकरच कपूर कुटूंबाची एन्ट्री होणार आहे.रणबीर आणि आलियाचं वांद्रे येथे स्वप्नातलं घर तयार होत आहे. अनेकदा या बंगल्याच काम पाहण्यासाठी हे कपल तिथे दिसले आहेत.

# अदिती राव हैदरीने केलं दुसरं लग्न?



सुप्रसिद्ध अभिनेत्री अदिती राव हैदरीने दुसरं लग्न केल्याची बातमी समोर आली आहे. तिने दाक्षिणात्य अभिनेता सिद्धार्थशी तेलंगणामध्ये लग्नगाठ बांधली आहे, असं म्हटलं जात आहे. अदिती व सिद्धार्थ यांनी आज (२७ मार्च रोजी) तेलंगणातील वानापर्थी जिल्ह्यातील श्रीरंगापुरम येथील श्री रंगनायकस्वामी मंदिरात लग्न केलं, असं वृत्त 'ग्रेट आंध्र'ने दिलं आहे. अदिती व सिद्धार्थने अद्याप लग्नाची माहिती दिली नसली, तरी लवकरच ते फोटो शेअर करतील, असं म्हटलं जात आहे. अद्याप या दोघांनी किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणीही याबाबत काहीच माहिती दिलेली नाही. तसेच त्यांच्या लग्नाचे फोटो अथवा व्हिडीओ समोर आलेले नाहीत. पण त्यांनी खासगी समारंभात साधेपणाने लग्न केल्याच्या चर्चा होत आहेत.'महा समुद्रम' नावाच्या चित्रपटात अदिती व सिद्धार्थने एकत्र काम केलं होतं. त्या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान आदिती व सिद्धार्थ एकमेकांच्या प्रेमात पडले आणि रिलेशनशिपमध्ये होते. अनेकदा ते कार्यक्रमांना एकत्र हजेरी लावत असतात.

# विन डिझेलने शेअर केला दीपिकासह फोटो

अभिनेत्री दीपिका पदुकोणने बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयाने लोकांच्या मनावर राज्य केलं. बॉलीवूडबरोबरच हॉलीवूडमध्येही तिने अभिनयाचा ठसा उमटवला आहे. अमेरिकन अभिनेता आणि चित्रपट निर्मिता विन डिझेल याच्याबरोबर 'ट्रिपल एक्स: रिटर्न ऑफ जेंडर केज' या अमेरिकन ॲक्शन चित्रपटात दीपिकाने प्रमुख भूमिका साकारली होती. या अभिनेत्याने आता त्याच्या सोशल मीडियावर दीपिकाबरोबरचा फोटो शेअर केला आहे, जो सध्या चर्चेत आहे. विन डिझेलने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे, ज्यात तो दीपिकाला फर जॅकेट घालताना दिसतोय. 'ट्रिपल एक्स: रिटर्न ऑफ जेंडर केज' चित्रपटाचे दिग्दर्शक डीजे कारुसो, या फोटोत ऑटोरिक्षाच्या चालकाच्या सीटवर बसलेले दिसत आहेत.फोटोला कॅप्शन देत विन डिझेलने लिहिले, "माझ्याबरोबर एकापेक्षा जास्त वेळा काम करू इच्छिणाऱ्या दिग्दर्शकांबद्दल मी जेव्हा विचार करतो, तेव्हा मला नेहमीच नम्र वाटतं. दीपिकाला वचन दिल्याप्रमाणे मी भारतात गेलो तेव्हाचा हा एक फोटो आहे. त्यावेळी मी दिग्दर्शक डीजे कारुसोबरोबर होतो. आम्ही निर्मितीच्या कामात व्यस्त असताना डीजेने मला पाठवलेली स्क्रिप्ट माझ्या मुलीने वाचली, तेव्हा ती रडली. ती का रडली याबद्दल मी तिला विचारलं, यावर ती म्हणाली, यात एका भावा आणि बहिणीची गोष्ट आहे जी खूप खरी वाटते आणि भावनिकसुद्धा आहे."प्रेक्षकांना विचारत विन पुढे म्हणाला, "जर माझी मुलगी स्क्रिप्ट वाचून रडली आणि असे चित्रपट मी बनवू शकलो तर माझ्या बहिणीची भूमिका कोण करू शकेल, असा माझा तुम्हाला प्रश्न आहे. तिने जेनिफर लॉरेन्स हे नाव सुचवले.

# 'सावरकर' चित्रपटासाठी अंकिताने किती मानधन घेतलं?



'स्वातंत्र्य वीर सावरकर' चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून, अभिनेता रणदीप हुड्डा आणि अभिनेत्री अंकिता लोखंडे यांच्या अभिनयाची चर्चा सर्वत्र सुरू आहे. बॉलीवूडसह मराठी इंडस्ट्रीमधील अनेक कलाकारांनी या चित्रपटाबद्दल आपला अभिप्राय दिला. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत 'स्वातंत्र्य वीर सावरकर' चित्रपटाचे निर्माते संदीप सिंग यांनी हा चित्रपट अत्यंत कठीण टप्प्यावर असताना अंकितानं त्यांना कशी मदत केली त्याबद्दल सांगितलं. इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत संदीप म्हणाले, "जेव्हा मी मिस्टर भन्साळींबरोबर सीईओ म्हणून काम करीत होतो तेव्हा मी 'राम-लीला', 'बाजीराव मस्तानी', 'मेरी कोम', 'गब्बर इज बॅक' व 'राउडी राठोड' या चित्रपटांची सह-निर्मिती करीत होतो, तेव्हापासून अंकिता हीच एक माझी मैत्रीण होती; जिचा माझ्यावर विश्वास होता. खरं तर, अंकिता आणि कंगना याच पहिल्या लोकांपैकी एक होत्या; ज्यांनी मला सांगितलं की, तू दिग्दर्शक व्हायला पाहिजेस."“ती मला (अंकिता) म्हणाली होती की, संदीप जेव्हाही तुम्ही चित्रपट बनवाल तेव्हा त्यात मी अभिनय करीन "जेव्हा मी 'सफेद' चित्रपट बनवला तेव्हा मी तिच्याशी संपर्क साधला; पण ती चित्रपट करू शकली नाही. पण जेव्हा मी शूटिंग करीत होतो तेव्हा आम्ही दोघं संपर्कात होतो." असं संदीप पुढे म्हणाले.अंकितानं कोणत्या परिस्थितीत हा चित्रपट साईन केला याबद्दल त्यानं अधिक तपशीलवार माहिती दिली. त्यांच्या संवादाबाबत बोलताना ते म्हणाले, "ज्या वेळी मी 'स्वातंत्र्य वीर सावरकर' चित्रपट करायला घेतला त्यावेळी कोणीही माझ्याबरोबर काम करायला इच्छुक नव्हते. कारण- तेव्हा मी खूप मीडिया ट्रायलमधून गेलो होतो. मी तिला कधीच सांगितलं नव्हतं की, माझ्याबरोबर कोणीच काम करू इच्छित नाही. अंकितानं 'स्वातंत्र्य वीर सावरकर' या चित्रपटात यमुनाबाईंची भूमिका साकारावी, असं मला वाटत होतं." त्यावर ती म्हणाली, "माझी एक अट आहे की, मी या चित्रपटासाठी पैसे घेणार नाही.

# ‘रन’ धुमाळीत हैदराबादची सरशी!

## अभिषेकने शर्माने हैदराबादसाठी रचला इतिहास!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था



**आयपीएल २०२४ च्या ८ व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने मुंबई इंडियन्सचा ३१ धावांनी पराभव केला. या सामन्यात हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना क्लासेनच्या नाबाद ८० धांवाच्या खेळीच्या जोरावर २० षटकांत ३ गडी २७७ धावा करताना आयपीएल इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. त्याचबरोबर मुंबईला २७८ विक्रमी लक्ष दिले होते. मात्र, प्रत्युत्तरात मुंबईचा संघ २० षटकांत २४६/५ धावाच करू शकला. तिलक वर्माने मुंबईसाठी शानदार फलंदाजी करताना सर्वाधिक ६४ धावांची खेळी साकारली. पण तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.**

हैदराबाद संघाचे सर्वच फलंदाजांनी मुंबईच्या गोलंदाजांची खूप धुलाई केली. ज्यामध्ये सर्वात पुढे नाव होते हेन्रिक क्लासेनचे. हैदराबादसाठी हेन्रिक क्लासेनने सर्वाधिक नाबाद ८० धावांची खेळी केली. त्याने ३४ चेंडूंचा सामना करताना ७ षटकार आणि ४ चौकार लगावले. मार्करमने नाबाद ४२ धावा केल्या. त्याचबरोबर अभिषेक शर्माने ६३ आणि ट्रॅव्हिस हेडने ६२ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. ज्यामुळे हैदराबाद संघाला आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारण्यात यश आले. या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, ही कदाचित त्यांच्यासाठी या सामन्यात मोठी चूक ठरली. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने आयपीएल इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या धावफलकावर लावली, ज्याचा पाठलाग मुंबई करू शकली नाही. मुंबईच्या फलंदाजांनी संघाला विजय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करत राहिले, तरी विजय मिळवता आला नाही. आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या असलेल्या २७८ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या मुंबई संघाची चांगली सुरुवात झाली. रोहित शर्मा आणि इशान किशन यांनी पहिल्या विकेटसाठी ५६ (२० चेंडू) धावांची भागीदारी केली. पण संघाला पहिला धक्का चौथ्या षटकात इशानच्या रूपाने बसला, जो १३ चेंडूत २ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ३४ धावा काढून बाद झाला.त्यानंतर मुंबईने रोहित शर्माच्या रूपाने दुसरी विकेट गमावली. जो पाचव्या षटकात १ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने २६ धावा (१२ चेंडू) करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर तिलक वर्मा आणि नमन धीर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ८४ धावांची (३७ चेंडू) भागीदारी केल्याने चाहत्यांच्या आशा पुन्हा एकदा उंचावल्या. पण ही भागीदारी ११व्या षटकात १ चौकार आणि १ षटकारांच्या मदतीने ३० धावा (१४ चेंडू) करून बाद झालेल्या नमन धीरच्या विकेटने संपुष्टात आली. यानंतर १५ व्या षटकात तिलक वर्मा पॅव्हेलियनमध्ये परतला, त्याने ३४ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकार लगावत ६४ धावा केल्या. यानंतर १८व्या षटकात कर्णधार हार्दिक पंड्याच्या रूपाने संघाला पाचवा धक्का बसला. कर्णधार पंड्याने २० चेंडूत १ चौकार आणि १ षटकार मारत २४ धावा केल्या. बाद होण्यापूर्वी हार्दिकने टीम डेव्हिडसोबत पाचव्या विकेटसाठी ४२ (२३ चेंडू) धावांची भागीदारी केली होती. टीम डेव्हिडने शेवटपर्यंत उभे राहून २२ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह ४२* धावा केल्या.ट्रॅव्हिस हेडने अभिषेक शर्मासह डाव सांभाळला. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी २३ चेंडूत ६८ धावांची भागीदारी केली. आठव्या षटकात जेराल्ड कोएत्झीने हेडची विकेट घेतली. हेडने २४ चेंडूत ६२ धावांची शानदार खेळी केली. यादरम्यान त्याने आपल्या बॅटमधून ९ चौकार आणि ३ षटकार मारले. यानंतर अभिषेक शर्मा आणि एडन मार्कराम यांच्यात ४८ धावांची भागीदारी झाली.

### रहाणेने एक कमाल झेल टिपला

» अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक झळकावत अभिषेकने इतिहास रचला आहे. या शानदार खेळीमुळे हैदराबाद संघाने अवघ्या ७ षटकांत १०० धावांचा आकडा गाठला होता. मुंबईविरुद्ध सर्वात जलद अर्धशतक झळकावण्याच्या बाबतीत हेड तिसऱ्या स्थानावर आहे.तो एसआरएचसाठी सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम डेव्हिड वॉर्नरच्या नावावर होता. पण ट्रॅव्हिस हेडने त्याला मागे सोडले होते आणि नंतर काही वेळाने तोही मागे पडला. हैदराबादकडून खेळताना वॉर्नरने २० चेंडूत दोनवेळा अर्धशतक झळकावले होते.ट्रॅव्हिस हेडने अवघ्या २४ चेंडूत ३ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने ६२ धावांची शानदार खेळी केली. यानंतर अभिषेक शर्माने कहर केला.

# भारत आणि पाकिस्तान यांच्यात मालिका होणार?

## क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आयोजनासाठी व्यक्त केली इच्छा

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज



**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना पाहण्यासाठी चाहते नेहमीच खूप उत्सुक असतात. पण दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध फक्त कोणत्या ना कोणत्या स्पर्धेत खेळताना दिसतात, मग तो आशिया चषक असो, टी-२० विश्वचषक असो किंवा एकदिवसीय विश्वचषक असो. दोन्ही देशांच्या संघांमध्ये द्विपक्षीय मालिका खेळल्या जात नाहीत. पण आता क्रिकेट ऑस्ट्रेलियाने दोन्ही संघांमध्ये द्विपक्षीय मालिका आयोजित करण्याची विशेष इच्छा व्यक्त केली आहे.**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शेवटची द्विपक्षीय मालिका २०१२-१३ मध्ये खेळली गेली होती. तेव्हापासून दोन्ही संघ फक्त आशिया कप किंवा आयसीसी स्पर्धांमध्ये एकमेकांविरुद्ध खेळतात. मेलबर्न क्रिकेट ग्राउंड (एमसीजी) येथे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील २०२२ टी-२० विश्वचषक सामन्याच्या मेगा यशानंतर क्रिकेट ऑस्ट्रेलिया अत्यंत आनंदी आहे, जिथे शेवटच्या चेंडूपर्यंत ९०,२९३ चाहत्यांनी थ्रिलर पाहिला. त्या सामन्यात विराट कोहलीने ८२* धावांची ऐतिहासिक खेळी केली होती. सीए, मेलबर्न क्रिकेट क्लब (एमसीजी ऑपरेटर) आणि व्हिक्टोरियन सरकारने आता एमसीजी येथे या दोन संघांमधील सामन्यात स्वारस्य व्यक्त केले आहे, जे त्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करू शकेल.क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे (सीए) सीईओ निक हॉकले म्हणाले की, संधी मिळाल्यास प्रतिष्ठित एमसीजीमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय मालिका आयोजित करण्यातआनंद होईल.ते म्हणाला, ‘मला वाटतं एमसीजीमधील भारत-पाकिस्तान सामन्यासाठी जे कोणी इथे आले होते, ते अविस्मरणीय आठवणीसह माघारी परतले होते. त्यामुळे लोकांना पुन्हा एकदा सामना बघायचा आहे.

### तिरंगी मालिका करण्यात स्वारस्य

» आम्हाला संधी मिळाल्यास आम्हाला ते होस्ट करायला आवडेल. या दोन देशांमधील मालिका होस्ट करण्याची संधी मिळाली, तर ही भूमिका पार पाडायला आम्हाला आवडेल.आम्ही पाकिस्तानचे यजमानपदासाठी खूप उत्सुक आहोत. भारताचे यजमानपदासाठी आम्ही उत्सुक आहोत. जर आम्ही मदत करू शकलो तर ते छान आहे. पण मला वाटते की ही एक द्विपक्षीय मालिका आहे.’ सीए इव्हेंट्सचे प्रमुख पीटर रोच यांनी मंगळवारी कबूल केले की ऑस्ट्रेलियाला तटस्थ द्विपक्षीय मालिकेऐवजी तिरंगी मालिका आयोजित करण्यात स्वारस्य आहे, जी भारत आणि पाकिस्तान दरम्यान १९९९-२००० हंगामात शेवटची झाली होती, परंतु सध्याच्या फ्युचर टूर्स प्रोग्राम (एफटीपी) मध्ये पुरेशी जागा नसल्याचे त्यांनी सांगितले.